# अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे-०५

दिनांक-०८-०२-२०१८

## वसतिगृह निर्वाह भत्ता/ विद्या वेतन योजना (Hostel Maintenance)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गामधील (OBC प्रवर्ग वगळून) जे विद्यार्थी फक्त **शिष्यवृत्तीधारक** आहेत व ज्यांना कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळालेला आहे अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता/विद्या वेतन योजनेचा अर्ज मॅन्युअली भरुन दिनांक ११/०२/२०१८ पूर्वी लेखाविभागात सादर करावेत. अनुसुचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र नोटीस लावण्यात येईल. तसेच जे विद्यार्थी कॉलेजच्या वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्यास पात्र आहेत परंतु त्यांची नावे Waiting List मध्ये आहेत अशा वसतिगृहाबाहेर राहणा-या विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार निर्वाहभत्ता देण्यास शासन मंजूरी प्रदान करीत आहे.

१. विद्यार्थी भारत सरकार **शिष्यवृत्तीधारक** असावा

२. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्नाची मर्यादा आहे तीच मर्यादा या योजनेस लागू राहील.

३.सदरहू विद्यार्थ्याने कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला होता पण प्रवेश मिळालेला नाही, त्याबाबतचे प्रमाणपत्र शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहाच्या अधिका-यांमार्फत प्राप्त करुन घ्यावे लागेल.

४. जे विद्यार्थी कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र आहेत परंतु त्या विद्यार्थ्यांना कॉलेजच्या वसतिगृह व व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही परंतु त्यांनी त्यांची राहण्याची सोय इतर ठिकाणी म्हणजे खाजगी वसतिगृहात किंवा खोली भाडयाने घेउन केलेली आहे, असे विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणाच्या घरमालकाचे प्रमाणपत्रासह करारपत्र (**आग्रिमेंट**)/शपथपत्र (**ॲफिडेव्हिट**) दाखल करणे आवश्यक आहे व दर महिना खोली भाडे भरत असल्याचे पवती अर्जासोबत जोडावे. जर एखादया विद्यार्थ्याला इतर शिष्यवृत्तीमधून वसतिगृह भत्ता मिळत असेल तर अशा विद्यार्थ्यांनी वरील वसतिगृह भत्त्यासाठी अर्ज करु नये. (उदा. राजर्षी शाहूमहाराज शिष्यवृत्ती )

**अर्ज भरताना काही अडचण असेल तर लेखा विभागात चौकशी करावी त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. कृपया चुकीचा अर्ज भरु नये. स्थानिक विद्यार्थी किंवा स्वतःच्या घरी किंवा नातेवाईकांकडे राहणारा विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असणार नाही.**

**<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे</u> : १ जात पडताळणी प्रमाणपत्र. २. जातीचा दाखला. ३. वसतीगृह बोनाफाईड प्रमाणपत्र. ४. वसतीगृह फि भरल्याची रिसीट. ५.उत्पन्नाचा दाखला. ६.मागील वर्षाचे गुणपत्रिका .७.दोन** Undertaking Forms. (**विद्यार्थी भंडारमध्ये उपलब्ध आहेत** ).

संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय ,
पुणे